
बालनाट्कली
डॉ. वासंती इनामदार-जोशी
परी
प्रकाशन

# बालनाटुकली

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

१. श्रीमंत डोकेदुखी ............. ३
२. श्रेष्ठ धनाचा मालक .......... १८
३. हा ही गेलं आणि हू ही गेलं ... २२
४. सचोटीचे फळ ............... ३२
५. मनीमाऊची खानावळ ........ ४१
६. कल्पक कारागीर ............. ५४
७. मौल्यवान वस्तू .............. ६०
८. पश्चिमेला उगवलेला सूर्य ..... ७०
९. तेजाचे यात्रिक ............... ७७
१०. टिकणारी संपत्ती ............. ९३
११. आभाळ पडले, चांदोमामा .... ९७
१२. जादूचा शिंपला ............. ११५
१३. कोल्हेरावांची भंबेरी .......... १३२
१४. डोळस दृष्टी .................. १४१
१५. दोनाचे दोनशे ................ १४९
१६. श्वेतकच्या शहाण्या चिमण्या .. १५६
१७. देशाचे मानकरी .............. १६७
१८. ऐकली कीर्ती, केली कृती .... १७८



# श्रीमंत डोकेदुखी

## पात्रे

१. श्रीमंत २. बायको
३. ज्योतिषी ४. ब्राह्मण
५. साधू

(एका श्रीमंताचे घर – गाद्या, गिरद्या, तक्के लोड, मोठा सरंजाम. एका लोडाला टेकून श्रीमंत माणूस बसलाय. त्याची बायको त्याच्या शेजारी त्याचे पाय चेपीत बसलेली)

श्रीमंत : ''अगं, पुरे कर तुझे पाय चेपणे. माझे दुखते आहे डोके आणि तू उठसूट पाय चेपते आहेस.''

बायको : ''अहो, मग डोक्यासाठी दोन तीनदा बाम लावला की मी, सुंठीचा लेप लावला. संत्र्याचा ज्यूस पिण्याने डोके दुखणे थांबते असे कुणी म्हणाले म्हणून तो दोन ग्लास भरून दिला. जे कुणी काही सांगेल ते ते सगळे काही करते आहे. फळफळावळ कापून देते आहे. दूध, लोणी तूप खायला देते आहे. कुणी म्हणालं गोडाचं द्या तर रोज जिलेबी, लाडू, गुलाबजाम, पाकातल्या पुऱ्या, पुरणपोळी, गूळपोळी, सगळं काही साग्रसंगीत करून देते आहे.''

श्रीमंत : ''अगं, ते खरं गं; पण त्याने काही फरक तर पडला पाहिजे की नको ? उलट आता माझी पोटदुखीही सुरू झालेली आहे. अगदी बेजार झालोय मी या दुखण्यानं. काय करावं काही समजत नाही आता.''

बायको : ''हो ना, वैद्य झाले, डॉक्टर झाले, हकीम झाले. अहो माझं जरा ऐका, तुम्ही एखाद्या ज्योतिषाला तरी विचारून बघा. काहीतरी सांगेल तरी तो. पत्रिका बघेल ग्रह वाईट असले की सुद्धा असे होते कधी कधी.''

श्रीमंत : ''बरं बाई ! तू म्हणतेस म्हणून जातोय; पण माझा काही ज्योतिषावर विश्वास नाही बघ. उगीचच काहीतरी थातूरमातूर सांगून पैसे उकळतात हे ज्योतिषी.''

बायको : ''अहो आता काढेनात. आपल्याला तरी आता काय कमी आहे म्हणून आपण विव्हळायचं ? सांगा. अहो त्यांचाही तो पोटापाण्याचा धंदाच आहे. चार पैसे त्यांच्या खिशात गेले तर तुम्हाला का एवढं वाईट वाटतेय ? हे बघा, आपल्याला बरं वाटल्याशी कारण. जाईनात चार पैसे, घेईना तो फायदा करून.''

श्रीमंत : ''अगं पण बाई, त्याने काय फरक पडणार ? काय सांगणार तो ?''

बायको : ''अहो, तेच बघा म्हणतेय ना मी. काय सांगतोय तो ते तरी जाऊन बघा की जरा. चला बघू आत्ताच जाऊया.''

(पडदा पडतो.)

✦

(पडदा उघडतो तेव्हा एक ज्योतिषी पंचांग घेऊन बारीक डोळे करून बघतो आहे. श्रीमंत आणि त्याची बायको दोघेही त्याच्यासमोर उत्सुकतेने बसलेले आहेत)

श्रीमंत : ''आजार जुना आहे तसा; पण आता तो फारच बळावला आहे म्हणून तुमच्याकडे आलेलो आहे.''

बायको : ''डॉक्टर वगैरे सगळे झाले. औषधपाण्यावर लाखो रुपये खर्च केले आम्ही; पण काडीचा उपयोग झाला नाही.''

ज्योतिषी : ''हे बघा, तुमची सगळी परिस्थिती आता माझ्या लक्षात आलेली आहे; पण तुम्हाला सांगावं की नाही याचा विचार करतोय मी. कसं सांगावं...''

श्रीमंत : ''सांगा सांगा. अनमान करू नका. जे काही असेल ते खरंच सांगून टाका एकदाचं.''

ज्योतिषी : ''तुम्हाला उगीच खोटेनाटे सांगून तुमची दिशाभूल मला करायची नाहीय. हो, तुमचे काहीतरी उगीच समाधान करण्यापेक्षा खरे खरे सांगितले तर अधिक बरे असा विचार करून सांगावं लागतंय. ऐका तुमची पत्रिका मी बारकाईने पाहिली. फार तपशील तुम्हाला सांगत नाही; पण तुमच्या पत्रिकेतले सगळेच ग्रह सध्या वक्री आहेत आणि खरं सांगायचं तर...''

श्रीमंत : ''अरे रामा रामा सगळेच वक्री ?''

ज्योतिषी : ''हो आणि खरं सांगायचं तर तुम्हाला सध्या साडेसातीच सुरू आहे.''

बायको : ''अरे देवा, आता काय करायचं हो ?''

ज्योतिषी : ''घाबरू नका. मी सांगतो तसं सगळं काही करणार आहात का ? तर सांगतो.''

श्रीमंत : ''सांगा सांगा, सगळं काही करतो; पण यावर उपाय सांगा. एकदाचं हे दुखणं जायला हवं.''

ज्योतिषी : ''जाईल हो. एवढी का काळजी करताय तुम्ही ? ग्रह कायमच वक्री राहत नाहीत. बदलत असते परिस्थिती मी लिहून देतो या कागदावर त्याचा जप तुम्ही रोज एकशे वीस वेळा करा.''

श्रीमंत : ''अरे बापरे ! मी ? पुजाऱ्याकडून केला तर ?''

ज्योतिषी : ''अं. करा. तसं करा ; पण करा म्हणजे झालं.''

बायको : ''एवढंच ना. मग ठीक आहे. बरं झालं.''

ज्योतिषी : ''अहो एवढंच नाही. दर शनिवारी म्हणजे जप चालू असेपर्यंत जेवढे शनिवार येतील त्या प्रत्येक शनिवारी सात ब्राह्मणांना पंचपक्वान्नांचं भोजन द्यायचं. यथाशक्ती दक्षिणा द्या. म्हणजे अगदी कमी नको. तुमच्या परिस्थितीला, अं.... म्हणजे श्रीमंतीला साजेशी दक्षिणा ब्राह्मणांना द्या.''

बायको : ''पण त्याने यांच्या तब्येतीत पडेल ना हो फरक काही ? फार गांजलोय हो आम्ही''

ज्योतिषी : ''हे बघा मी काही देव नाही; पण मी माझ्या बुद्धीला समजेल एवढे उपाय तुम्हाला सांगितलेले आहेत आणि असं बघा, तुम्हीच म्हणता कितीतरी डॉक्टर वगैरे झालेत. मग आता त्यात हे एवढं करून बघायला काय हरकत आहे असं म्हणतो आहे मी...''

श्रीमंत : ''ठीक आहे. करतो सगळे. आभारी आहे. तुम्ही हे उपाय सांगितल्याबद्दल. तुमची फी ?''

ज्योतिषी : ''मी तोंडाने सांगत नाही. कागदावर आहे.''
(कागद देतो. तो वाचून श्रीमंताची बोबडीच वळते. तो थरथर कापत म्हणतो)

श्रीमंत : ''एवढे पैसे मी आणलेले नाहीत हो. अं तुम्हाला नंतर पाठवून दिले तर चालेल का ?''

ज्योतिषी : ''हे बघा मी तुम्हाला उद्या भविष्य सांगेन असं म्हटलेय का ? आँ ? सांगा की, म्हटलं का ?''

श्रीमंत : ''नाही; पण... एवढे पैसे... आत्ता...''

ज्योतिषी : ''हे बघा, मला माहीत आहे तुम्ही माझे पैसे काही बुडवणार नाही ते; पण मी उद्या चाललोय अमेरिकेला. तेव्हा आत्ताच सगळं द्या. पैसे जर नसतील तर दागिने चालतील...''

बायको : ''क... काय, माझे दागिने देऊ ?''

ज्योतिषी : ''ते तुम्ही ठरवा. मी उपाय सुचवला मात्र पैसे दिल्याशिवाय तुम्हाला इथून हलता येणार नाही. बघा...काय करायचं ते...''

श्रीमंत : ''एऽऽ, अगं देऊन टाक तुझ्या सोन्याच्या चार बांगड्या, पाटल्या, गळ्यातली साखळी, हातातील अंगठी, दंडातली सोन्याची वाकी.''

ज्योतिषी : ''मंगळसूत्र राहू दे. ते नको.''

बायको : (गहिवरत) ''देते... काढते...''

(सगळे दागिने काढून देऊन, ज्योतिषाच्या पाया पडून दोघे जातात. ज्योतिषी दागिने हातात घेत खूश झालेला. पडदा पडतो.)

✦

(पडदा उघडतो तेव्हा, ब्राह्मण जेवून ढेकर देत जात असल्याचे दृश्य. एक ब्राह्मण श्रीमंताकडे येतो आणि त्याच्यापाशी बसत म्हणतो)

ब्राह्मण : ''हे बघा श्रीमंत, एवढे करताय तुम्ही तुमच्या व्याधीसाठी तर त्यात आणखी एक उपाय करा.''

बायको : (रागारागाने बाहेर येत) ''नको. काहीही सांगू नका. एवढं करून बघू तेवढं करून बघू म्हणत म्हणत त्या ज्योतिषाने तर मला अगदी लंकेची पार्वती करून सोडलं. आता हे काम शेवटचं. आता काहीही करणार नाही कळलं ?''

श्रीमंत : ''तू गप्प बस गं. सांगू दे त्यांना, आणि त्या ज्योतिषाकडं जाण्याची कल्पना तुझीच होती. उगीच आता त्याचं खापर कुणावर तरी फोडू नकोस हं. सांगा हो, काय म्हणत होता.''

ब्राह्मण : ''हे बघा, इच्छा असेल तरच हे करा. मी सांगतो म्हणून नको. कळलं का ?''

बायको : ''बरं बाई सांगा, इच्छा असो नसो उपाय तर केलेच पाहिजेत. सांगा, काय करायचेय ?''

ब्राह्मण : ''आमच्या गावाजवळच्या जंगलात एक साधू राहतो आहे. त्याला झाडपाल्याची, दुर्मिळ वनस्पतींची चांगली माहिती आहे. त्याने तिथे अशा वनस्पतींची लागवडही केलेली आहे. पुष्कळांना त्याचा गुण आलेला आहे, त्यांच्या झोपडीत राहूनच प्रत्येक पुरुषमाणसाने उपचार घेतले पाहिजेत.''

श्रीमंत : ''भटजीबुवा, मी इतका कंटाळलोय या डोकेदुखीला की त्यासाठी काहीही करण्याची माझी तयारी आहे सांगा, तो साधू कुठे राहतो ? मी आत्ताच तुमच्याबरोबर येतो बघा, बरं का गं माझ्या प्रवासांची तयारी कर. औषधं घेऊन घेऊन माझ्या जिभेची चवसुद्धा निघून गेलीय. अगं एऽऽ कळलं का ?''

बायको : ‘‘आता काय करू तयारी ते सांगा.’’

श्रीमंत : ‘‘हे बघ, मला महिनाभर त्या झोपडीत राहायचं आहे असं समजून त्याप्रमाणे खाद्यपदार्थ बांधून दे. जंगलात खायला काही मिळणंही मुश्कील.’’

बायको : ‘‘अहो, गुडघ्याला बाशिंग बांधू नका. तिथे तुम्हाला गुण येईलच कशावरून ? अं ? कुठला कोण तो साधू उगीच कशाला जाऊन राहताय त्या आडजंगलात ? काही जाऊ नका.’’

ब्राह्मण : ‘‘मी आधीच म्हटलेय. माझ्या सांगण्यावर जाऊ नका.’’

श्रीमंत : ‘‘हे बघ, माझा आता निश्चय झालाय. आला गुण तर आला. आता परमेश्वरावर भरवसा ठेवून हे शेवटचं करणार आहे मी. तू मला अडवू नकोस...’’

बायको : ‘‘मी कोण तुम्हाला अडवणारी ? आता तुमचीच इच्छा असेल शेवटची तर मी हे सगळं करणं भागच आहे. स्वयंपाक करणाऱ्या पाचसहा बायका बोलवते. त्यांच्याकडून बेसन लाडू, रवा लाडू, बुंदी लाडू, मोतीचूर लाडू , मुगाचे लाडू, डिंकाचे लाडू सगळ्या प्रकारचे लाडू करून घेते, शिवाय शेव, चकली, करंज्या, वड्या, पुरणपोळी, गूळपोळी, साटोऱ्या, सांज्याच्या पोळ्या, नाना पदार्थ तयार करून दुरड्या भरते तुमच्याबरोबर द्यायला. मग तर झालं ?’’

श्रीमंत : ‘‘आता कसं बोललीस ?’’
(बायको लगबगीने जाते. पडदा पडतो)

✦

(पडदा उघडतो तेव्हा जंगलाचा देखावा. एका हात गाडीवर लोड, गाद्या, दुरड्या वगैरे सामान भरून नोकर आलेले. एका साधूच्या झोपडीसमोर सर्व थांबतात. श्रीमंत खाली वाकून झोपडीत जप करीत बसलेल्या साधूच्या पाया पडतो. साधू डोळे उघडतो. इकडे तिकडे बघत तो विचारतो)

साधू : ‘‘या. तुमच्याविषयी भटजीबुवांनी सगळं सांगितलेय मला... पण... हे सगळं सामान तुम्ही कशासाठी इथं आणलं आहे ?’’

श्रीमंत : ‘‘साधू महाराज, हे सगळं माझं सामान आहे. तुम्हाला हे माहीतच आहे की मला डोकेदुखीचा फार त्रास होतो. सगळे उपाय थकले. तुमच्याकडून उपचार करून घ्यायला आलोय. तुम्ही मला बरं करा. तुम्ही सांगाल तसे मी वागायला तयार आहे; पण माझी डोकेदुखी. कृपा करून थांबवा तेवढी.’’

साधू : (मनाशीच बोलतो. स्वगत) ‘या श्रीमंताचे शरीर स्थूल आणि तुकतुकीत आहे. जसे फक्त दुधातुपावर पोसलेले पोट तर केवढे सुटलेले आहे; हंड्यासारखे आणि याच्या

हाता–पायाचा लठ्ठपणा तर हत्तीच्या पायासारखाच आहे. अरेरे, अति खाऊन याने आपल्या शरीराचे फार मातेरे करून घेतलेले आहे. अगदी सुखासीन आयुष्य जगणारा दिसतोय. शरीराला कसलेही कष्ट नाहीत व्यायाम नाही. याचे काय आरोग्य राहणार आहे...'

श्रीमंत : ''साधू महाराज तुम्ही बोलत का नाही ? तुम्ही काहीच बोलत नाही. गप्प का आहात? तुम्ही सांगाल तितके दिवस मी इथे राहायला तयार आहे.''

साधू : ''तुम्हाला माझ्याकडून खरेच औषधोपचार करून घ्यायचे आहेत का ? स्पष्ट, स्वच्छ सांगा. अनमान नको.''

श्रीमंत : ''होय साधूमहाराज, खरंच करून घ्यायचे आहेत. तुमची कीर्ती ऐकून आलोय. वाट्टेल तितका पैसा इथे खर्च करण्याची माझी तयारी आहे; पण माझी डोकेदुखी थांबवा हो. मी फार फार हैराण झालोय त्याने. अन्नसुद्धा गोड लागत नाही. त्यामुळे सारखी बेचैनी...''

साधू : ''मग नीट ऐका. मी सांगेन तसेच काटेकोर तुम्ही वागावला हवंय. कुठंही ढिलाई चालणार नाही. मी सांगेन ते पथ्य कडक आहे. ते नियमितपणे न टाळता, न कुरकुरता करायला पाहिजे. कळलं ?''

श्रीमंत : ''हो हो. सगळे करेन मी; पण नक्की बरं वाटेल ?''

साधू : ''तुम्ही आत्तापर्यंत एवढे उपाय केलेत तुम्हाला कुणी कुणी आश्वासन दिले ? सांगा की तुम्हाला या या उपायाने अगदी नक्की नक्की बरे वाटेल म्हणून ?''

श्रीमंत : (चाचरत) ''अं...न... नाही दिले आश्वासन.''

साधू : ''मग ? हे बघा, अहो प्रयत्न करणे फक्त आपल्या हातात असते. निदान तुमच्या या रोगाच्या बाबतीत तरी असे आश्वासन निश्चितपणे कुणीही देऊ शकत नाही; पण मी तरीही सांगतो, इतरांसारखा मी नाही. मला वाटते की तुमची डोकेदुखी कडक पथ्याने बरी होईल. बघायचा प्रयत्न करून.''

श्रीमंत : ''खरंच ? फार मोठे उपकार होतील हो तुमचे.''

साधू : ''पण मी पुन्हा सांगतो, विसरू नका, माझे पथ्य कडक आहे आणि तुम्हाला मी सांगेन तसेच वागायला लागेल. मुख्य म्हणजे सगळे नियमितपणे करायला हवे. एक दिवस केले दुसऱ्या दिवशी नाही, असे मुळीच चालणार नाही. कंटाळा मला अजिबात खपत नाही. आधीच सांगतो. तुम्हाला कळतेय ना सगळे ?''

श्रीमंत : ''होय साधू महाराज, तुम्ही सांगाल तसेच मी अगदी वागेन. अजिबात कंटाळणार नाही.''

साधू : ''ठीक आहे. मग आता ऐका, या गाद्या गिरद्या, लोड, तक्के, दुलया, ब्लँकेट, चादरी परत पाठवा. याची इथे काही आवश्यकता नाही.''

श्रीमंत : ''तुमच्यासाठी नाही ते. ते मला बसण्यासाठी झोपण्यासाठी आणलेय. इथे काहीच नसणार म्हणून.''

साधू : ''तुम्ही आत्ताच मला वचन दिलेत ना की, मी सांगेन तसेच वागेन म्हणून ?''

श्रीमंत : ''अं होय, ... अं...अरे, ते सगळे परत घोडागाडीत नेऊन ठेवा बघू.''

साधू : ''आणि या दुरड्या कसल्या ? काय आहे त्यात ?''

श्रीमंत : ''यात खाण्याचे पदार्थ आहेत. महाराज, तिखट, गोड पदार्थ इथे कुठे मिळणार. उगीच तुम्हाला त्रास नको म्हणून आणलेत.''

साधू : ''ठीक आहे. ते राहू देत. आता तुमच्या सर्व माणसांना जायला सांगा. तुम्हाला कमीत कमी एक महिनाभर इथे राहायला लागेल. बरोबर महिन्याने त्यांना बोलवा. एक महिना तुम्हाला घरी जाता येणार नाही. तुमच्या घरूनही तुम्हाला कुणी इथे भेटायला आलेले मला चालणार नाही. कबूल आहे का ते बघा.''

श्रीमंत : ''होय, कबूल आहे कबूल आहे. हे बघा रे तुम्ही घरी गेल्यावर तुमच्या मालकीणबाईंना हे सगळे सांगा आणि महिन्याभरानंतरच मी परत येईन. तोपर्यंत इकडे कुणीही फिरकू नका असे सांगा.''

(नोकर जातात. तोच रस्त्यावरून गलका ऐकू येतो)

श्रीमंत : ''साधू महाराज, हे बाहेर बरेच लोक का जमलेले आहेत? त्यांनाही औषधोपचार करून घ्यायचे आहेत का ?''

साधू : ''नाही, ते या जंगलातले आदिवासी आहेत. तुमची घोडागाडी बघून ते कुतूहलाने जमलेत. आता असं करा या इथे सगळ्या ज्या दुरड्या भरलेल्या आहेत ना. त्यातले सगळेच्या सगळे पदार्थ तुमच्या हाताने या आदिवासींना वाटून टाका वेळ न घालवता.''

श्रीमंत : ''अं... काय ?... सगळे वाटू ? ... अं... पण महाराज, ते मला महिनाभर खाण्यासाठी आणलेत. तुम्हीच राहू देत म्हणाला की मघाशी.''

साधू : ''बरोबर आहे की. मी असे वाटण्यासाठीच राहू दे म्हणालो. नाहीतर कशाला म्हणालो असतो ? अं ? नसतो म्हणालो तसं.''

श्रीमंत : ''पण... तसं सांगितलं असतं तर मी माझ्या नोकरांना अजून घेऊन यायला सांगितलं असतं.''

साधू : ''हे बघा. तुम्ही उगाच फाटे फोडू नका. मी तुम्हाला जे सांगेन तसं करायचं तुम्ही कबूल केलेत ना ?''

श्रीमंत : ''होय महाराज; पण थोडे तरी पदार्थ ठेवतो.''

साधू : ''काहीही ठेवायचे नाही. ते फराळाचे सगळे पदार्थ, पुरणपोळी, गूळपोळी, चिरोटे आणि काय काय आहे ते सगळेच्या सगळे वाटून टाका.''

श्रीमंत : ''बरं बरं. टाकतो टाकतो.''

(श्रीमंत जिवावर उदार होऊन सगळे पदार्थ वाटून टाकतो. त्याच्या चेहऱ्यावर त्याबद्दल दु:ख होते.)

साधू : ''आता ठीक झालं. आता तुम्ही जरा विश्रांती घ्या. समोर चटई टाकलेली आहेच. पडा जरा.''

श्रीमंत : ''चटईवर ? एखादी गादी ठेवली असती तर बरं झालं असतं. चटईवर मला टोचेल हो.''

साधू : ''हे बघा, आता तुम्ही माझ्याकडे आलेला आहात. तुम्हाला काही टोचलेबिचले तर त्याला माझ्याकडे औषध आहे. तुम्ही त्याची अजिबात काळजी करू नका. झोपा पाहिजे तर दमला असाल तर...''

श्रीमंत : ''साधू महाराज पण मला औषध देता ना ?''

साधू : ''औषध द्यायला मी मघाशीच सुरुवात केलेली आहे.''

श्रीमंत : ''अं ? मी कुठं औषध घेतलं ? आणि तुम्ही कधी दिलंत? नाही दिलं अहो, तुम्ही विसरला असाल साधू महाराज, आजपासून सुरू केले औषध तर मला लवकर बरे वाटेल. आजपासूनच द्या औषध.''

साधू : ''सांगितलं ना तुम्हाला, औषध द्यायला मी मघाशीच सुरुवात केलेली आहे म्हणून... मी माझ्या पद्धतीने सगळे करतोच आहे. मला कोणतीही सूचना करायची गरज नाही आणि मी काही विसरतही नाही.''

(असे म्हणून साधू ध्यानाला बसतो. श्रीमंत साधूकडे बघत मनात विचार करीत असतो की याने आपल्याला औषध दिले कधी नि आपण घेतले कधी)

श्रीमंत : (स्वगत) ''काय करावे आता. ही चटई तर अंगाला कशी टोचते आहे, गारही लागते आहे. आधीच या जंगलातलं झोंबरं वारं आणि गाद्या, दुलयापण परत पाठवाव्या लागल्या. आता या थंडीपासून माझं संरक्षण कसं काय होणार ? आणि आता मला भूकही लागलेली आहे, तहानही; पण करायचं काय ? यांनी काही सांगितल्याशिवाय काहीच करता येणार नाही. इथं येऊन मी वेडेपणा केला की काय असे आता वाटायला लागले आहे. तरी बायको म्हणत होती की जाऊ नका म्हणून. आपण नाही ऐकलं तिचं. जरा बाहेर तरी बघून येऊ, झोप तर लागणार नाहीच.

(झोपडीबाहेर येऊन बाहेरचा निसर्ग न्याहाळतो.)